**शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपलिका**
**कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना**
**जाहिर निविदा क्रमांक १८**

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल,पाष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**१.कोरे निविदा प्रपत्र विक्रि –** निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून बुधवार दिनांक ११/८/१० पासून मंगळवार दिनांक ३१/८/१० पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल.

**२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून बुधवार दिनांक ०१/०९/१० रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत

**३. निविदा उघडण्याची वेळ** बुधवार दिनांक ०१/०९/१० रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**४. निविदा दर** सर्व करांसह देणे आवश्यक आहे.

५ शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष २०१० – ११ अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपशिल

| **अ. क्र.** | **तपशील** | **अंदाजे नग संख्या पूर्व माध्यमिक** | **अंदाजे नग संख्या माध्यमिक** | **तरतूद रूपये** | **फॉर्म किंमत रूपये** |
|---|---|---|---|---|---|
| पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तके | | | | | |
| १ | मराठी माध्यम | १०५०० | २१०० | ७० लक्ष | २०००/– |
| २ | उर्दू माध्यम | १०५० | ३०० | ७ लक्ष | ७५०/– |
| ३ | इंग्रजी माध्यम | ५०० | १०० | ३ लक्ष | ७५०/– |

## सुचना –

१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.निविदा फॉर्म सोबत अटी,स्पेसिफिकेशन,निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा शिक्षण मंडळाने स्थापन केलेल्या खरेदी समितीचा अधिकार आहे व राहील

३.सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळज्ञचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/— | स्वाक्षरी/— |
| **अध्यक्ष,** | **शिक्षणप्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका** | **शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका** |

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन २०१०–११**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – १/९/२०१०**
**वेळ – १.०० वाजेपर्यंत**
**मराठी बयाणा रूपये ७००००/–**
**मराठी माध्यम पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तके**

मनपा प्राथमिक शाळेतील इ. ४थी व ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या परीक्षा विभागाने निर्धारित केलेल्या सुधारीत अभ्यासक्रमानुसार शिष्यवृत्ती परिक्षेस उपयुक्त पुस्तके, स्वयंअध्ययन पुस्तिका, प्रश्नसंच खरेदी करावयाची आहेत. पुस्तकावर निर्धारित केलेल्या किमतीवर जास्तीत जास्त सूट देणाऱ्या व कमी किमतीस तसेच वेळेत पुस्तके पुरवठा करणाऱ्यांकडून विहित नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. आलेल्या पुस्तकांची तज्ञ शिक्षक समिती व पुस्तक निविड समिती यांचेकडून विहित निकषाला अनुसरून पुस्तकाची निवड करण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तकांच्या प्रती(इ.४थी) | माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तकांच्या प्रती(इ.७वी) |
|---|---|---|---|
| १ | मराठी माध्यम | १०५०० | २१०० |

१. प्रत्येक पुस्तकाचा नमूना निविदेसोबत देणे आवश्यक आहे. नमूना नसल्यास निविदा स्विकारली जाणार नाही.
२. छापील किंमतीपेक्षा जास्त दरांचा विचार केला जाणार नाही.
३. शाळावार वाटप करावे लागेल.
४. छापील किंमतीवर जास्तीत जास्त वटाव देण्यात यावा.

**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन २०१०—११**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक — १/९/२०१०**
**वेळ— १.०० वाजेपर्यंत**
**इंग्रजी बयाणा रूपये ३०००/—**
**इंग्रजी माध्यम पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तके**

मनपा प्राथमिक शाळेतील इ. ४थी व ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या परीक्षा विभागाने निर्धारित केलेल्या सुधारीत अभ्यासक्रमानुसार शिष्यवृत्ती परिक्षेस उपयुक्त पुस्तके, स्वयंअध्ययन पुस्तिका, प्रश्नसंच खरेदी करावयाची आहेत. पुस्तकावर निर्धारित केलेल्या किमतीवर जास्तीत जास्त सूट देणाऱ्या व कमी किमतीस तसेच वेळेत पुस्तके पुरवठा करणाऱ्यांकडून विहित नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. आलेल्या पुस्तकांची तज्ञ शिक्षक समिती व पुस्तक निविड समिती यांचेकडून विहित निकषाला अनुसरून पुस्तकाची निवड करण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तकांच्या प्रती(इ.४थी) | माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तकांच्या प्रती(इ.७वी) |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी माध्यम | ५०० | १०० |

१. प्रत्येक पुस्तकाचा नमूना निविदेसोबत देणे आवश्यक आहे. नमूना नसल्यास निविदा स्विकारली जाणार नाही.
२. छापील किंमतीपेक्षा जास्त दरांचा विचार केला जाणार नाही.
३. शाळावार वाटप करावे लागेल.
४. छापील किंमतीवर जास्तीत जास्त वटाव देण्यात यावा.

**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
## स्पेसिफिकेशन २०१०–११
## निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – १/९/२०१०
## वेळ– दु. १.०० वाजेपर्यंत
## उर्दू बयाणा रूपये ७०००/–
## उर्दू माध्यम पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तके

मनपा प्राथमिक शाळेतील इ. ४थी व ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या परीक्षा विभागाने निर्धारित केलेल्या सुधारीत अभ्यासक्रमानुसार शिष्यवृत्ती परिक्षेस उपयुक्त पुस्तके, स्वयंअध्ययन पुस्तिका, प्रश्नसंच खरेदी करावयाची आहेत. पुस्तकावर निर्धारित केलेल्या किमतीवर जास्तीत जास्त सूट देणाऱ्या व कमी किमतीस तसेच वेळेत पुस्तके पुरवठा करणाऱ्यांकडून विहित नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. आलेल्या पुस्तकांची तज्ञ शिक्षक समिती व पुस्तक निविड समिती यांचेकडून विहित निकषाला अनुसरून पुस्तकाची निवड करण्यात येईल.

| अ. क्र. | तपशील | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तकांच्या प्रती(इ.४थी) अंदाजे | माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तकांच्या प्रती(इ.७वी) अंदाजे |
|---|---|---|---|
| १ | उर्दू माध्यम | १०५० | ३०० |

१. प्रत्येक पुस्तकाचा नमूना निविदेसोबत देणे आवश्यक आहे. नमूना नसल्यास निविदा स्विकारली जाणार नाही.
२. छापील किंमतीपेक्षा जास्त दरांचा विचार केला जाणार नाही.
३. शाळावार वाटप करावे लागेल.
४. छापील किंमतीवर जास्तीत जास्त वटाव देण्यात यावा.

**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजी नगर, पुणे ४११००५.
# पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती पुस्तके पुरविणेकामी निविदा
# अटी व शर्ती २०१०—११.

पुणे पुढारी व सामना दि. ११/०८/१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं.१८/भांडार/विद्यार्थी **शिष्यवृत्ती पुस्तके पुरविणेकामी** पुरविण्याचे कामी **विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा खालीलप्रमाणे:—**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे शैक्षणिक वर्ष २०१०—११ चे करिता खालील परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, परिशिष्ट क मध्ये नमून केलेल्या त्या त्या एकूण संख्येमध्ये **शिष्यवृत्ती पुस्तके** विशिष्ट मुदतीत पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात येत असून, त्या निवीदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**परिशिष्ठ अ**

**१. अटी व शर्ती :—**

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.
२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**३अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असले तरीसुध्दा बयाणा वरील रकमा रोख भराव्या लागतील.
**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.
**क)**आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च २०१० अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.
**इ)**शासन अंगिकृत व इतर संस्थांना **शिष्यवृत्ती पुस्तके** पुरवल्या बाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.
**ई)**निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील ३ वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.
**उ)** निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शाासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

**ए)** व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.
ऐ) निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधिची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅंकेचे प्रमाणपत्र (बॅंक सॉलव्हान्सी) चालू वर्षाची निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे.
ओ) अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.
४.अ पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.
५.पाकीट "ब" मध्ये निविदा धारकाने पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्तीचे सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

**६.निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. **शिष्यवृत्ती पुस्तके** दर अंकी व अक्षरी लिहावेत.
२. निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस /मा.शिक्षण मंडळास राहिल.
३. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीस/मा.शिक्षण मंडळास आहे.
४.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असर्मथता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.
५.मान्य निवीदादारास करार करतेवेळी **शिष्यवृत्ती पुस्तके** पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD)किंवा रोखीने भरावी लागेल.
६.निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०–११ करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.
७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
८. **शिष्यवृत्ती पुस्तके** पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस/मा.शिक्षण मंडळास राहिल.
९. दिलेल्या मुदतीत परिशिष्ठ ब मध्ये नमुदकेल्याप्रमाणे **शिष्यवृत्ती पुस्तके** न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.
१०.करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे **शिष्यवृत्ती पुस्तके** कार्यालयाने दिलेल्या यादीनुसार मनपा शाळांमध्ये स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

११. करारनाम्यानुसार व परिशिष्ठ ब नुसार मुदतीत **शिष्यवृत्ती पुस्तके** न आल्यास स्विकारले जाणार नाहीत मुदतीत न स्विकारलेले **शिष्यवृत्ती पुस्तके** १० दिवसांच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्या ठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू.५०००/— (अक्षरी रूपये पाच हजार फक्त ) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहुना शिक्षण मंडळ संबधित नाकारलेल्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करेल.

१२.पुरवठा केलेले सर्व **शिष्यवृत्ती पुस्तके** मोजून, घेवून दिलेल्या परिशिष्ठ ब प्रमाणे सर्व **शिष्यवृत्ती पुस्तके** असल्याची खात्री मा.खरेदी समितीस झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१३.निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा.खरेदी समिती/त्यांचे अधिकृत सभासदभेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१४.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१५. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदादाराने **शिष्यवृत्ती पुस्तके** पुरविण्यास तयार झालेली आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती खरेदी समितीस केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१७. **शिष्यवृत्ती पुस्तके** पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१८.निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

१९. **शिष्यवृत्ती पुस्तके** सांगितलेल्या शाळेत पुरविल्यानंतर त्याची खरेदी समितीकडून पाहणी करण्यात येईल.पुरविलेले **शिष्यवृत्ती पुस्तके** विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेले **शिष्यवृत्ती पुस्तके** कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत.

२०. मंजुर केलेले साहित्य परिशिष्ठ ब प्रमाणे ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या **शिष्यवृत्ती पुस्तके** एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म. न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार **शिष्यवृत्ती पुस्तके** पुरवठा करताना प्राप्त केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा.मुख्याध्यापकाच्या नाव, स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील व पुणे मनपाकडील जकात विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२१. निविदा दिनांक १/९/२०१० रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांक:—

**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**